# परिशिष्ट (नमुना-2)

657

जा.क्र.जिपना/शिक्षा/प्रा-[illegible]/ 2023
कार्यालय शिक्षण विभाग (प्रा.)
जिल्हा परिषद, नांदेड
दिनांकः- 27 JAN 2023

प्रति,
मुख्याध्यापक ,
नागार्जुना पब्लिक स्कुल,
कौठा नांदेड ता. जि. नांदेड

विषय:- बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम, 2009 यांच्या कलम 18 च्या प्रयोजनार्थ, बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम, 2011 याच्या नियम 11, पोट नियम(4) अन्वये शाळांना मान्यता प्रमाणपत्र देण्याबाबत.

आपला दिनांक 06.01.2023 च्या अर्जाच्या संदर्भात आणि त्यानंतर या संदर्भात शाळेशी केलेला पत्रव्यवहार / शाळेची केलेली तपासणी दि **11.01.2023** च्या आधारे मी शिक्षणाधिकारी (प्रा.) जिल्हा परिषद, नांदेड दिनांक **11.01.2023 ते 10.01.2026** पर्यंत तीन वर्षाच्या कालावधीसाठी **इयत्ता 1ली ते 8वी इंग्रजी माध्यम स्वयंअर्थसहाय्यित** शाळा करिता **नागार्जुना पब्लिक स्कुल, कौठा नांदेड ता. जि. नांदेड** शाळेस तात्पुरती मान्यता देत आहे.

**वरील मान्यता ही खालील शर्तीच्या पूर्ततेच्या अधीन आहे.**

1- मान्यतेचा कालावधी वाढवून मिळणार नाही आणि इयत्ता आठवीनंतर मान्यता किंवा संलग्नता देण्यास कोणत्याही परिस्थितीत कोणतेही बंधन नसेल.

2- बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम,2009(जोडपत्र एक) आणि महाराष्ट्र बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, 2011 (जोडपत्र दोन) मधील तरतुदींचे, शाळा पालन करील.

3- शाळा नजीकच्या दुर्बल घटकातील आणि वंचित गटातील बालकांना, पहिल्या इयत्तेत, त्या इयत्तेतील विद्यार्थी संख्येच्या किमान 25% मर्यादेपर्यंत प्रवेश देईल आणि प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल परंतु आणखी असे की, पूर्व प्राथमिक इयत्तांच्या बाबतीतदेखील या प्रमाणकाचे अनुपालन करण्यात येईल.

4- परिच्छेद 3 निर्दिष्ट केलेल्या बालकांकरिता शाळेला अधिनियमाच्या कलम 12(2) नुसार प्रतिपूर्ती मिळेल, अशी परिपूर्ती मिळण्यासाठी शाळेला स्वतंत्र बँक खाते देण्यात येईल.

5- संस्था/शाळा कोणतीही कॅपिटेशन फी वसूल करणार नाही आणि कोणत्याही छाननी पध्दतीसाठी बालकास किंवा त्याच्या किंवा तिच्या मात्या-पित्यास किंवा पालकास भाग पाडणार नाही.

6- कोणत्याही बालकास वयाच्या पुराव्याच्या अभावी, धर्म, जात किंवा वंश, जन्म ठिकाण किंवा यांपैकी कोणत्याही कारणास्तव, शाळेमध्ये प्रवेश नाकारण्यात येणार नाही.

7- (एक) शाळेत प्रवेश दिलेल्या कोणतयाही बालकास तो ज्या इयत्तेत असेल त्याच इयत्तेत रोखून ठेवले जाणारनाही किंवा प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत शाळेतून काढून टाकण्यात येणार नाही.

(दोन) कोणतयाही बालकास शारीरिक शिक्षा किंवा मानसिक त्रास देण्यात येणार नाही.

(तीन) कोणत्याही बालकास प्राथमिक शिक्षण पूर्ण हाईपर्यंत कोणत्याही मंडळाची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असणार नाही.

(चार) प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेल्या प्रत्येक बालकास, नियम 23 अन्वये निर्धारित केलेले प्रमाणपत्र देण्यात येईल.

(पाच) विकलांग/विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांच्या अधिनियमाच्या तरतुदींनुसार समावेश करण्यात येईल.

(सहा) अधिनियमाच्या कलम 23(1) अन्वये निर्धारीत केलेली किमान अर्हता धारण करणाऱ्या शिक्षकांची नियुक्ती करण्यात येईल. परंतु आणखी असे की, अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास किमान अर्हता धारण न करणाऱ्या शिक्षकांना अशी किमान अर्हता 5 वर्षाच्या कालावधीत संपादित करावी लागेल.

(सात) अधिनियमाच्या कलम 24(1) मध्ये विनिर्दिष्ट केलेली त्याची /तिची कर्तव्ये शिक्षक पार पाडतील आणि.

(आठ) शिक्षकाने / शिक्षिकेने खाजगी शिकवणीच्या कामात स्वतःला गुंतवून घेऊ नये. याची सुनिश्चिती शाळा करील.

( मागे पहा )

Scanned with OKEN Scanner

Scanned with CamScanner

8- शाळा समुचित प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या अभ्यासक्रमाच्या आधारे तयार केलेल्या पाठ्यक्रमाचे पालन करील.

9- शाळा, अधिनियमाच्या कलम 19 मध्ये विहित केल्याप्रमाणे शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधांच्या प्रमाणात विद्यार्थ्यांना प्रवेश देईल.

10-शाळा अधिनियमाच्या कलम 19 मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मानकांचे व प्रमाणकांचे पालन करील. मागील तपासणीच्या वेळेत शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधा खालीलप्रमाणे होत्या:-

- शाळेच्या परिसराचे क्षेत्रफळ:- 16187.42 चौ.मिटर
- एकूण बांधकाम क्षेत्र :- 4207.76 चौ.मिटर
- खेळाच्या मैदानाचे क्षेत्रफळ:- 11979.67 चौ.मिटर
- वर्गखोल्यांची संख्या:- 76
- कार्यालय -नि-भांडार-नि-मुख्याध्यापकांची खोली :- 04
- मुलांसाठी व मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधनगृहे-जेणे वापरण्यासाठी व प्रसाधनगृहे स्वच्छ आणि आरोग्यदायी स्थितीत ठेवण्यासाठी पुरेसे पाणी असेल :- आहे
- पिण्याच्या पाण्याची सुविधा:- आहे
- दुपारचे जेवण शिजविण्यासाठी स्वयंपाकघर :- आहे.
- अध्यापन अध्ययन साहित्य /खेळ व क्रीडाविषयक सामग्री/ ग्रंथालय यांची उपलब्धता:- आहे
- वाचन साहित्य विनायासारा उपलब्ध :- आहे

11-मान्यता नसलेले वर्ग किंवा तुकडया, शाळेच्या नावाने शाळेच्या परिसरात किंवा इतरत्र, चालविता येणार नाहीत.

12-शाळेची इमारत किंवा इतर बांधकाम किंवा क्रीडांगण हे केवळ शिक्षणाच्या व कौशल्य विकासाच्या प्रयोजनार्थ वापरण्यात येतील.

13-शाळा, सोसायटी नोंदणी अधिनियम, 1860(1860 चा 21) किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, 1950 अन्वये नोंदणी झालेल्या संस्थेमार्फत चालविण्यात येत आहे.

14-शाळा कोणत्याही व्यक्तीच्या, गटाच्या किंवा व्यक्तीसंघाच्या किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या फायद्याकरिता किंवा कोणताही नफा मिळविण्यासाठी चालविण्यात येत नाही.

15-शाळेचे लेखे सनदी लेखापालाकडून लेखापरिक्षित व प्रमाणित करुन घ्यावेत आणि नियमानुसार योग्य लेखा विवरणपत्रे तयार करावीत. प्रत्येक लेखा विवरणपत्राची एक प्रत दरवर्षी जिल्हा शिक्षणाधिकाऱ्यांकडे पाठवण्यात यावी.

16-तुमच्या शाळेला मिळालेल्या मान्यता संकेतांक 27151702002 असा आहे. या कार्यालयाशी कोणताही पत्रव्यवहार करतांना कृपया तो नमूद करावा, याची नोंद घ्यावी.

17-शिक्षण संचालक/जिल्हा शिक्षणाधिकारी वेळोवेळी मागणी करतील असे अहवाल व माहिती शाळेने सादर करावी किंवा शाळेच्या मान्यतेच्या शर्तीची निरंतर पूर्तता करण्यासाठी किंवा शाळेच्या कामकाजातील त्रुटी दूर करण्यासाठी शासन किंवा स्थानिक प्राधिकरण देईल अशा सूचनांचे पालन करावे.

18-संस्थेच्या नोंदणीचे कोणतेही असल्यास नूतनीकरण केल्याची सुनिश्चिती करावी.

19-जोडपत्र तीन नुसार इतर शर्ती यासोबत जोडल्या आहेत.

– सही –
(डॉ.सौ सविता बिरगे)
शिक्षणाधिकारी (प्रा.)
जिल्हा परिषद, नांदेड

**प्रतिलिपी:-**

1) मा.शिक्षण संचालक (प्रा.) शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे-1 यांना सविनय सादर.
2) मा.शिक्षण उपसंचालक लातूर विभाग लातूर यांना सविनय सादर.
3) गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती नांदेड यांना माहितीस्तव.
4) अध्यक्ष / सचिव, विद्यादिप एज्युकेशनल सोशल ॲन्ड कल्चरल (तेलगु) सोसायटी नांदेड जि..नांदेड यांना माहितीस्तव.

Principal
Nagarjuna Public School
CBSE Affiliation No 1130310

(डॉ.सौ.सविता बिरगे)
शिक्षणाधिकारी (प्रा.)
जिल्हा परिषद, नांदेड

Scanned with OKEN Scanner
Scanned with CamScanner